क्वाड सदस्य देशांमध्ये भविष्यात लष्करी सहकार्य राहावे याचा प्रयत्न म्हणून या कवायतींकडे पाहिले जात आहे. जपान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांचेही अनेक वादग्रस्त प्रश्नांवरून चीनशी संबंध ताणले गेले आहेत. इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनचा वाढणारा प्रभाव हा प्रश्न प्रामुख्याने चर्चेचा मुद्दा आहे.

या कवायतींमध्ये सहभाग घेतलेले देश इंडो-पॅसिफिक क्षेत्रात संरक्षणविषयक सहकार्य करण्यास बांधील आहेत हे यावरून स्पष्ट होते, असे अमेरिकेच्या दूतावासातून ट्वीट करण्यात आले आहे.

**चीनची अपेक्षा**

बीजिंगमधून आलेल्या वृत्तानुसार, मलबार कवायतींबाबत चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन यांना विचारले असता ते म्हणाले की, कवायती प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यासाठी पोषक ठरतील, प्रतिकूल ठरणार नाहीत अशी अपेक्षा आहे.

या कवायतींबद्दल चीनने संशय व्यक्त केला आहे. इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठी या कवायती होत आहेत, असा चीनचा समज आहे.

# टपाली मतदानाबाबत ट्रम्प यांचा न्यायालयात दाद मागण्याचा इशारा



**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

**अमेरिकेतील ऐतिहासिक** अध्यक्षीय निवडणुकीत मंगळवारी सकाळी ६ वाजल्यापासूनच न्यूयॉर्क शहरासह अनेक राज्यांत मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. सुप्त बहुमताच्या लाटेवर निवडून येण्याचा दावा ट्रम्प व बायडेन या दोघांच्या प्रचार गटांनी केला आहे.

दरम्यान अध्यक्ष ट्रम्प यांनी टपाली मतदानावरून आक्रमक पवित्रा घेत निवडणुकांचा निकाल मान्य न करता न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला आहे. काहीही निकाल लागला तरी तो अमान्य करू असेच ट्रम्प यांनी म्हटले आहे. पेनसिल्वानियातील टपाली मतदान जर मतमोजणीनंतर तीन दिवसांनी मोजले जाणार असेल तर आपण न्यायालयात जाणार आहोत असे ट्रम्प यांनी सांगितले.

आपणच विजयी होऊ असा विश्वास अध्यक्ष ट्रम्प यांनी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केला. दरम्यान ह्यूस्टन येथील १ लाख २७ हजार टपाली मते मोजणीतून बाद करण्याची रिपब्लिकन पक्षाची याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. मतदानाच्या दिवशी गैरप्रकार होऊ नयेत यासाठी व्हाइट हाऊसभोवती कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. एकूण सोळा कोटी मतदानातून रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प व डेमोक्रॅटिक पक्षाचे ज्यो बायडेन यांच्यापैकी कोण अध्यक्ष होणार हे ठरणार आहे. एकूण पात्र मतदार २४ कोटी आहेत. इ.स. १९०० नंतर प्रथमच सोळा कोटी मतदान होण्याची शक्यता फ्लोरिडा विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक मायकेल मॅकडोनाल्ड यांनी वर्तवली आहे.

करोनाच्या साथीत झालेले हाल, २ लाख २९ हजार करोना बळी, कृष्णवर्णीयांवरील पोलिसी अत्याचारातून झालेल्या दंगली, चीनशी घेतलेला संघर्षाचा पवित्रा व आर्थिक नाकेबंदी, इराणशी उभा दावा, भारताची दक्षिण चीन सागरात चीनला रोखण्यासाठी भलामण या सगळ्या पार्श्वभूमीवर या निवडणुका होत आहेत. २०१६ पेक्षा यावेळी मतदान जास्त असणार आहे. कारण इतर काही राज्यात अगोदरच २०१६ मधील मतदानाचे आकडे ओलांडले गेले आहेत.

डेमोक्रॅटिक पक्षाचे बायडेन यांचे समर्थक अजय जैन बुटोरिया यांनी सांगितले की, सुरुवातीलाच मतदानाने जोर पकडला असून त्याचा अर्थ लोक बायडेन यांच्या बाजूने आहेत. २०१६ मध्ये ५ कोटी मतदारांनी आधीच मतदान केले होते, यावेळी १० कोटी मतदारांनी आधीच टपालाने मतदान केले आहे.

# करोनाकाळात पाकिस्तानकडून दहशतवाद

## संयुक्त राष्ट्रांत भारताचा आरोप





**वृत्तसंस्था, संयुक्त राष्ट्रे**

**करोना साथीचा** गैरफायदा घेत पाकिस्तानने सीमेपलीकडून दहशतवाद पसरवला, असा आरोप भारताने संयुक्त राष्ट्रातील संवादात केला आहे. पाकिस्तानने नेहमीच द्वेषमूलक वक्तव्ये करून भारतातील धार्मिक समुदायात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला असेही या वेळी सांगण्यात आले.

समकालीन वंशवाद, वंशभेद, धर्मद्वेष्टेपणा व असहिष्णुता या मुद्द्यावर संवाद साधताना भारताचे प्रतिनिधी आशिष शर्मा यांनी सांगितले, की, पाकिस्तानने केवळ भारतातील विशिष्ट समुदायाविषयीच नव्हे तर संघटना, व्यक्ती, राजकीय नेते यांच्याविरोधात द्वेषमूलक वक्तव्ये केली आहेत. जग करोना साथीने ठप्प झालेले असताना पाकिस्तानने त्याचा फायदा घेत सीमेपलीकडून भारतात दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानने द्वेषमूलक संभाषणाचा वापर करून आमच्या देशात हिंसा व असहिष्णुता माजवली. संयुक्त राष्ट्रांच्या मंचाचा वापर करुन कुटील राष्ट्रीय मोहीम राबवण्याचा प्रयत्न केला.

पाकिस्तान धार्मिक समुदायांमध्ये तेढ निर्माण करीत असल्याचे सांगून ते म्हणाले की, भारतात त्यांच्या या प्रक्षोभक कृतींना प्रतिसाद मिळालेला नाही. भारत हा विविधतेत एकता व सहअस्तित्व मानणारा देश असून सर्व समुदायांनी लोकशाही रचनेत एकोप्याने राहावे, या मताचा आहे. आज जगापुढे केवळ कोविड साथीचे आव्हान नसून गैरमाहितीच्या साथीचे संकट आहे.

द्वेषमूलक वक्तव्ये व दोन समाजांत दुहीची बीजे पेरण्याचे प्रयत्न सीमेपलिकडून चालू आहेत. भारतात कोविड साथीचा मुकाबला करताना सर्व नागरिकांना समान सुविधा दिल्या जात आहेत. त्यात कधीही भेदभाव करण्यात आला नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

### ‘इन्फोडेमिक’ जाहीरनाम्यानुसार निषेध

**जूनमध्ये भारतासह बारा देशांनी कोविड साथीच्या पार्श्वभूमीवर ‘गैरमाहितीची साथ’ यावर ‘इन्फोडेमिक’ नावाचा आंतरप्रादेशिक जाहीरनामा मंजूर केला होता. त्यानुसार साथीच्या काळात गैरमाहिती पसरवून द्वेषमूलक वक्तव्यांच्या आधारे हिंसा पसरवण्याच्या पाकिस्तानसारख्या काही देशांच्या प्रयत्नांचा निषेध करण्यात आला.**

### खलिस्तानवाद्यांच्या १२ संकेतस्थळांवर बंदी

**नवी दिल्ली : खलिस्तानवादी संघटनांच्या १२ संकेतस्थळांवर बंदी घालण्याचे आदेश केंद्र सरकारने जारी केले आहेत. यातील काही संकेतस्थळे ही प्रतिबंधित संघटनांकडून चालवली जात होती. त्यावर खलिस्तानचे समर्थन करणारा आशय होता, अशी तक्रार आहे. या संकेतस्थळांत एसएफजे ४ फार्मर्स, पीबीटीम, सेवा ४१३, पीबी ४ यू यांचा समावेश आहे. बंदीचे आदेश इलेक्ट्रॉनिक व माहिती तंत्रज्ञान खात्याने दिले आहेत.**

### व्हिएन्नात आयसिसच्या हल्ल्यात पाच ठार

**व्हिएन्ना :** ऑस्ट्रियाची राजधानी असलेल्या व्हिएन्नातील मध्यवर्ती ठिकाणी करोना टाळेबंदी पुन्हा सुरू होण्याच्या काही तास आधी आयसिसच्या दहशतवादी कृत्यात एका हल्लेखोरासह पाच जण ठार, तर १७ जण जखमी झाले. हल्लेखोर हा वीस वर्षांचा होता आणि त्याच्याकडे ऑस्ट्रिया तसेच उत्तर मॅसेडोनिया असे दुहेरी नागरिकत्व होते. सोमवारी सायंकाळी आठ वाजता व्हिएन्नाच्या मुख्य अग्यारीजवळ हा हल्ला करण्यात आला. हल्लेखोराकडे रायफल आणि बनावट आत्मघाती अंगरखा होता. त्याला पोलिसांनी ठार केले. सात जणांची प्रकृती गंभीर असून एकूण सतरा जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### ५० जिहादींना ठार केल्याचा फ्रान्सचा दावा

**पॅरिस :** पश्चिम आफ्रिकेमध्ये दहशतवाद्यांशी लढणाऱ्या फ्रान्सच्या लष्कराने मालीमध्ये नुकत्याच केलेल्या कारवाईत ५० जिहादींना ठार केल्याचे फ्रान्सच्या संरक्षणमंत्र्यांनी सांगितले. फ्रान्सचे लष्कर बारखाने प्रांतात असून जिहादींकडून शस्त्र हस्तगत केली आहेत, असेही संरक्षणमंत्री फ्लॉरेन्स पार्ले यांनी ट्वीट केले आहे.

# विख्यात पत्रकार रॉबर्ट फिस्क यांचे निधन

**बैरूत :** मध्य पूर्वेतील वार्तांकनात निष्णात मानले गेलेले प्रसिद्ध ब्रिटिश पत्रकार रॉबर्ट फिस्क यांचे नुकतेच डब्लिन येथे निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. मध्य-पूर्वेतील संघर्षग्रस्त भागात राहून त्यांनी वार्तांकन केले होते.

फिस्क यांच्या वार्तांकनाने नेहमीच वादाचे मुद्दे चर्चेला आले. आयर्लंडची राजधानी डब्लिन येथे अल्पशा आजारानंतर त्यांना रुग्णालयात दाखल केले होते. त्या काळातील नामवंत पत्रकार अशा शब्दांत दी इंडिपेंडंटने त्यांचा गौरव केला आहे. अल कायदाचा दहशतवादी ओसामा बिन लादेन याची अनेकदा मुलाखत घेणाऱ्या पत्रकारांपैकी ते एक होते. ११ सप्टेंबर २०११ रोजीच्या हल्ल्यानंतर ते पाकिस्तान अफगाण सीमेवर गेले होते. तेथे अफगाणी शरणार्थींनी त्यांच्यावर हल्ला केला होता.

निर्भिडता, तडजोडी न करणे, सत्य शोधण्यासाठी कुठलीही किंमत मोजायला तयार असणे व वास्तव मांडणे हे आदर्श पत्रकारांकडून अपेक्षित असलेले सर्व गुण त्यांच्यात होते, त्यामुळे ते यशस्वी झाले, असे मत ‘दी इंडिपेंडंट’चे व्यवस्थापकीय



संचालक ख्रिस्तियन ब्राउटन यांनी व्यक्त केले. फिस्क यांनी पेटवलेली पत्रकारितेची अग्निशिखा यापुढेही तशीच तेजाळत राहील, असे ते म्हणाले.

इंग्लंडमधील केंट येथे जन्मलेल्या फिस्क यांनी कारकीर्दीची सुरुवात ‘दी संडे एक्स्प्रेस’मधून केली. नंतर ते ‘दी टाइम्स’मध्ये गेले. उत्तर आयर्लंड, पोर्तुगाल, मध्य पूर्व या ठिकाणी त्यांनी काम केले. १९७६ मध्ये ते बैरूतमध्ये गेले त्यावेळी तेथे यादवी माजली होती. बैरूतमध्ये असताना त्यांनी मध्य-पूर्वेत बराच प्रवास केला. इराण-इराक युद्ध, अरब–इस्त्रायल संघर्ष, अल्जिरियातील युद्ध, अफगाणिस्तानातील संघर्ष, सद्दाम हुसेनचे कुवेतमधील आक्रमण नंतर अमेरिकेचे इराकमधील आक्रमण, अरब स्प्रिंग आंदोलन, सीरियातील यादवी युद्ध याचे वार्तांकन त्यांनी केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी निलोफर पाझिरा असून त्या चित्रपट निर्मात्या व मानवी हक्क कार्यकर्त्या आहेत.

# सौम्य करोनाचे सात लक्षणसमूह

**वृत्तसंस्था, लंडन**

**कोविड १९ संसर्गातून** निर्माण होणाऱ्या लक्षणांचे सात नवीन प्रकार वैज्ञानिकांनी शोधून काढले आहेत. करोना विषाणूचा संसर्ग झाल्यानंतरही दहा आठवड्यांच्या काळात प्रतिकारशक्ती प्रणालीत बदल झालेले दिसून आले आहेत. या संशोधनाचा उपयोग करोना रुग्णांनी नंतर कशी काळजी घ्यावी किंवा सक्षम लस नेमकी कशा स्वरूपाची असावी हे ठरवण्यासाठी होणार आहे.

‘ॲलर्जी’ या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनात कोविड १९ चा संसर्ग झालेल्या १०९ रुग्णांची व ९८ निरोगी व्यक्तींची तपासणी करण्यात आली. त्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. व्हिएन्नातील वैद्यकीय विद्यापीठातील वैज्ञानिकांनी हे संशोधन केले असून त्यांच्या मते करोनाचे एकूण सात लक्षणसमूह निष्पन्न झाले आहेत. त्यात फ्लू सदृश ताप, थंडी, थकवा व कफ यांचा समावेश आहे. दुसऱ्या प्रकारात सर्दीसारखी लक्षणे म्हणजे शिंका, घसा कोरडा पडणे, नाक चोंदणे, स्नायुदुखी यांचा समावेश आहे. काही रुग्णांमध्ये डोळे व श्लेष्मल आवरणाची आग होते.



फुफ्फुसाच्या समस्या, न्यूमोनिया, श्वास घेण्यात अडथळे, आतड्याच्या समस्या जसे की अतिसार, मळमळणे, डोकेदुखी, वास व चव जाणे या सारख्या लक्षणांचाही समावेश आहे.

रुग्णांच्या एका गटात असे दिसून आले की, वास व चव गेलेल्या व ज्यांची प्रतिकारशक्ती प्रणाली सक्षम आहे, त्यांच्यात टी लिंफोसाइटस (टी-लसिकापेशी) जास्त असतात. त्या करोना संसर्गात थायमस ग्रंथीतून स्थलांतरित होतात असे यातील सहसंशोधक विनफ्राइड एफ पिकल यांनी म्हटले आहे. यात गट १ व ३ यांच्यातील लक्षणांत अवयव विशिष्ट तर गट ६ व ७ मध्ये प्राथमिक करोना लक्षणे दिसून आली. कोविड १९ विषाणू आपल्या प्रतिकारशक्तीवर दीर्घकालीन परिणाम करीत असतो. जे रुग्ण बरे झालेले आहेत त्यांच्या रक्ताचे परीक्षण केल्यानंतर ते दिसून आले आहे. बोटाचे ठसे जसे मागे राहतात तशा खुणा कोविड १९ विषाणू शरीराच्या आत ठेवून जातो. या खुणा रक्तात जैविक पद्धतीने दिसून येतात.

**नेमके काय परिणाम होतात...**

कोविड १९ विषाणू नेमके काय परिणाम शरीरात करतो याबाबत उदाहरण देताना त्यांनी सांगितले की, मानवी प्रतिकारशक्ती प्रणालीतील ग्रॅन्युलोसाइटस या पेशी जीवाणू तसेच विषाणूंशी लढण्याचे काम करतात. कोविड १९ रुग्णात त्या कमी झालेल्या दिसून आल्या. सीडी ४ व सीडी ८ टी पेशी या प्रतिकारशक्तीतील स्मृती पेशींच्या संचाचे काम करतात त्यातील सीडी ८ टी नावाच्या पेशी जास्त क्रियाशील झालेल्या दिसून आल्या. याचा अर्थ सुरुवातीच्या संसर्गानंतर या पेशी बराच काळ लढत राहतात. अनेक रुग्णांच्या रक्तात प्रतिपिंड निर्माण करणाऱ्या प्रतिकारशक्ती पेशींची पातळी वाढलेली दिसली. कमी पातळीवरच्या करोना संसर्गात जेवढा ताप जास्त तेवढे प्रतिपिंड जास्त दिसून आले. करोना १९ विषाणूशी लढताना आपली प्रतिकारशक्ती दुप्पट शक्तीने काम करीत असते असे दिसून आले आहे. प्रतिकारशक्ती प्रणाली व प्रतिपिंड हे दोन्ही झुंज देतात. या संशोधनाचा उपयोग प्रभावी लस तयार करण्यासाठी होऊ शकतो.


**एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड**
(पूर्वीची एशियन ऑइलफिल्ड सर्व्हिसेस लिमिटेड)
सीआयएन: एल२३२००एमएच१९९२पीएलसी३१८३५३
नोंदणीकृत कार्यालय: ३ बी, तिसरा मजला, ओमकार एस्क्वेअर, चुनाभट्टी सिग्नल, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, सायन (पू.), मुंबई-४०००२२, महाराष्ट्र, भारत
टेलि.: ०२२-४२४४ ११००; फॅक्स: ०२२-४२४४ ११२०
ई-मेल: secretarial@asianenergy.com, वेबसाइट: www.asianoilfield.com

**सूचना**

सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ यासह वाचलेल्या रेग्युलेशन २९ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, **३० सप्टेंबर, २०२०** रोजी संपलेल्या तिमाही व अर्ध वर्षाकरिता कंपनीचे स्वतंत्र व एकत्रिकृत अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष, इतर गोष्टींसमवेत, विचारात घेण्याकरिता आणि मान्य करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ऑडिओ व्हिज्युअल मोडद्वारा **बुधवार, ११ नोव्हेंबर, २०२० रोजी दु. १२.३० वा.** घेण्याचे निर्धारित करण्यात आले आहे.

ही माहिती **www.asianoilfield.com** या कंपनीच्या वेबसाइटवर आणि **www.bseindia.com** या स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
अर्चना नाडगौडा
कंपनी सचिव

तारीख: ०४.११.२०२०
स्थळ: मुंबई

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**
जीआयएस मॅपिंग/जीपीएस सर्व्हेच्या तयारीकरिता निविदा सूचना
(१) निविदा सूचना क्र. : ई-आर-टी-६१-२०-२१
तारीख : २०.१०.२०२०
**कामाचे नाव** : रायपूर विभागाच्या विविध ॲसेट्सच्या हँड हेल्ड डिव्हाइसेस प्लस डेटा प्रोसेसिंगद्वारा जीआयएस मॅपिंग/ जीपीएस सर्व्हेची तयारी करणे.
**निविदा मूल्य** : रु. ३२,५८,७१३/-. **इरठे** : रु. ६५,२००/-. **निविदेचे सादरीकरण** : २६.११.२०२० रोजी स. ११.०० वा.पर्यंत. **निविदेची उघडणी** : २६.११.२०२० रोजी स. ११.०० वा.
निविदा कागदपत्रांची खरेदी/ अधिक तपशील, पात्रता कसोट्या व वरील कामाकरिता संपूर्ण सविस्तर माहिती याकरिता कृपया सीनि. एडीईएन(कं.)/ रायपूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा **www.ireps.gov.in** या आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली निविदा कागदपत्रे पाहावी/ डाऊनलोड करावी.
विभागीय अभियंता (आय)
पीआर/आर/इंजि/एएन/९९ द.पू.म. रेल्वे, रायपूर
दक्षिण पूर्व मध्य रेल्वे @secrail

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकार चा उपक्रम)

ई-निविदा आमंत्रित करणारी सूचना

मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, पात्र कंत्राटदारांकडून पुढील कामांकरिता आयआरईपीएस पोर्टलच्या माध्यमाने ई-टेंडरिंगद्वारे एकल बोली प्रणाली मध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहे :

१) **कामाचे नाव** : कोंकण रेल्वेच्या एसएसई/मडगाव यांच्या अधिकार क्षेत्रातील रेल्वे ट्रॅकचे मेंटेनन्स करण्यासाठी पी वे झोनल (Pway Zonal) करार. **निविदा क्रमांक** : केआर-डब्ल्यू-०१-५८-२०२०-०७. **अंदाजित खर्च** : रु. ४,१८,९७,७१७/- (जीएसटी वगळून).

२) **कामाचे नाव** : कोंकण रेल्वेच्या एसएसई/कारवार यांच्या अधिकार क्षेत्रातील रेल्वे ट्रॅकचे मेंटेनन्स करण्यासाठी पी वे झोनल (Pway Zonal) करार. **निविदा क्रमांक** : केआर-डब्ल्यू-०१-५८-२०२०-०८. **अंदाजित खर्च** : रु. ४,२९,९०,५९६/- (जीएसटी वगळून).

३) **कामाचे नाव** : कोंकण रेल्वेच्या एसएसई/भटकळ यांच्या अधिकार क्षेत्रातील रेल्वे ट्रॅकचे मेंटेनन्स करण्यासाठी पी वे झोनल (Pway Zonal) करार. **निविदा क्रमांक** : केआर-डब्ल्यू-०१-५८-२०२०-०९. **अंदाजित खर्च** : रु. ४,०७,७५,७६५/- (जीएसटी वगळून).

४) **कामाचे नाव** : कोंकण रेल्वेच्या एसएसई/उडुपी यांच्या अधिकार क्षेत्रातील रेल्वे ट्रॅकचे मेंटेनन्स करण्यासाठी पी वे झोनल (Pway Zonal) करार. **निविदा क्रमांक** : केआर-डब्ल्यू-०१-५८-२०२०-१०. **अंदाजित खर्च** : रु. ४,०४,६७,८८७/- (जीएसटी वगळून).

**कार्य पुर्ण करण्याचा कालावधी**: दोन वर्ष मान्सून सहित. **प्रस्ताव/बोली ऑनलाईन सादर करण्याकरीता शेवटची तारीख आणि वेळ**: २५.११.२०२० रोजी १५:०० वाजे पर्यंत. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. अधिक माहिती/भाग घेण्यासाठी कृपया **www.ireps.gov.in** चे संकेतस्थळ पाहु शकता. स्पष्टीकरण/ शुध्दीपत्रक केवळ ह्याच संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल.

**जिल्हा रूग्णालय, नंदुरबार**
**ई-निविदा सुचना क्र.०६/२०२०-२१**

जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय, नंदुरबार यांचे कडून जिल्हा रूग्णालय, नंदुरबार व अखत्यारीतील ग्रामीण/उपजिल्हा रूग्णालये यांचे करीता ऑक्सीजन सिलेंडर पुनर्भरण करून घेणे करीता इच्छुक पुरवठा दारांकडून ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.
टीप: १) उपरोक्त निविदेची संपुर्ण माहीती महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(सही)
ठिकाण : नंदुरबार — जिल्हा शल्य चिकित्सक
दि. ०२/११/२०२० — जिल्हा रूग्णालय, नंदुरबार

**टीसीपीएल पॅकेजिंग लिमिटेड**
CIN: L22210MH1987PLC044505
नोंदणीकृत कार्यालय:- एम्पायर मिल्स कॉम्प्लेक्स, 414, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई 400 013
दूरध्वनी: +91 22 61646000 फॅक्स: 91 22 24935893, ईमेल: info@tcpl.in वेबसाईट: www.tcpl.in

**सूचना**

सेबीच्या (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅन्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) नियम २०१५ मधील नियम ४७ आणि नियम २९ ला अनुसरून, येथे असे सूचित करण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही बुधवार, ११ नोव्हेंबर, २०२० रोजी, कंपनीच्या एम्पायर मिल्स कॉम्प्लेक्स, ४१४, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे, ज्यामध्ये या ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवार्षिक काळातील लेखापरिक्षण न झालेल्या आर्थिक अहवालांचा विचार विनिमय केला जाईल, त्यांना मंजूरी देण्यात येईल.
ही सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.tcpl.in** वर तसे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेड च्या **www.bseindia.com** तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या **www.nseindia.com** संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.
टीसीपीएल पॅकेजिंग लिमिटेडकरिता
स्थळ: मुंबई — हरिश अन्चन
तारीख: ३.११.२०२० — कंपनी सचिव

**बोरोसील लिमिटेड**
(पूर्वीची होपवेल टेबलवेअर लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय : ११०१, क्रीसेन्झो, जी ब्लॉक, एमसीए क्लब समोर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१, महाराष्ट्र, भारत. सीआयएन: एल३६१००एमएच२०१०पीएलसी२९२७२२
फोन क्र.०२२-६७४०६३०० फॅक्स क्र.०२२-६७४०६५१४
वेबसाईट: www.borosil.com ईमेल: borosilltd@borosil.com

**सूचना**

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिसक्लोजर रिक्वायमेंट्स) नियम २०१५ मधील नियम ४७ सोबत वाचले असता नियम २९ अन्वये ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३० सप्टेंबर २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीकरिता अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता तसेच मंजुरीसाठी **शुक्रवार, नोव्हेंबर १३, २०२०** रोजी बोरोसील लिमिटेडच्या (पूर्वीची होपवेल टेबलवेअर लिमिटेड) संचालक मंडळाची सभा होणार आहे.
ही सूचना बीएसई लिमिटेडची वेबसाईट **www.bseindia.com**, नॅशनल स्टॉक एक्चेंज लिमिटेडची वेबसाइट **www.nseindia.com**, आणि कंपनीची वेबसाईट **www.borosil.com** वर उपलब्ध आहे.
बोरोसील लिमिटेड करिता
(पूर्वीची होपवेल टेबलवेअर लिमिटेड)
मनोज डेरे
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
एफसीएस क्र. ७६५२
स्थळ : मुंबई
दिनांक : नोव्हेंबर ०३, २०२०

**सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.**
CFM ASSET RECONSTRUCTION PVT LTD
कॉर्पोरेट कार्यालय: १ला मजला, वेकफील्ड हाऊस, स्प्रॉट रोड, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई- ४०००३८.

**जाहीर सूचना / लिलाव सूचना**

**मेसर्स पॅनोरॅमिक युनिव्हर्सल लि. - प्रभादेवी, मुंबई ४०००२५ येथील स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना व हमीदारांना / गहाणकर्त्यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (प्रतिभूत धनको) यांच्याकडे तारणगहाण ठेवलेली/ भारित असलेली निम्नवर्णित स्थावर मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा प्रतिभूत धनको, सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.च्या (सीएफएमएआरसी ट्रस्ट-१ अपना बँकेचे विश्वस्त या नात्याने कार्यरत) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, **“जशी आहे जेथे आहे”, “जशी आहे जी आहे”, “तेथे जे काही आहे”** आणि विना साहाय्य तत्त्वावर जाहीर लिलावद्वारा विकण्यात येणार आहे.
एका घरात एकत्रीकृत केलेल्या दोन्ही सदनिकांची राखीव किंमत आहे रु.२६,००,००,०००/- (रुपये सव्वीस कोटी फक्त) आणि इसारा रक्कम ठेव (इरठे) आहे रु.२,६०,००,०००/- (रुपये दोन कोटी साठ लाख फक्त) २०१९ चा एम.ए. नं. १३४० मध्ये २.११.२०२० रोजी स्पेशल एमपीआयडी कोर्ट, मुंबईद्वारा निर्गमित सूचना व आदेशान्वये बोल्या १ डिसेंबर २०२० च्या सायं. ५ वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी “दी रजिस्ट्रार (सेशन्स), सिटी सेशन्स कोर्ट, कोर्ट नं. ३६, मुंबई-३२” यांच्याकडे मोहोरबंद लिफाफ्यातून सादर करणे आवश्यक आहे आणि बोल्या ३ डिसेंबर २०२० रोजी दुपारी १ वाजता कोर्ट रूम नं. ३६ मध्ये उघडल्या जातील.

| प्रतिभूत धनकोचे नाव | कर्जदाराचे, गहाणकर्त्याचे व हमीदाराचे नाव | स्थावर मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ (चटई) | राखीव किंमत | (इरठे) |
|---|---|---|---|---|---|
| सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (सीएफएम-एआरसी) | (१) मे. पॅनोरॅमिक युनिव्हर्सल लि., कर्जदार आणि गहाणकर्ते (२) विद्या सुधीर मोरवेकर (३) सिद्धार्थ सुधीर मोरवेकर (४) ध्यानराज सुधीर मोरवेकर | १. माहीम डिव्हिजनचा टीपीएस IV मधील प्लॉट नं. १०५४ ते १०५६, सामना प्रेसजवळ, न्यू प्रभादेवी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ येथील सुमेर ट्रिनिटी टॉवर, बिल्डिंग नं. १च्या २२व्या मजल्यावरील १९५५ चौ. फूट चटई क्षेत्रफळ असलेल्या सदनिका क्र. २२०१ (जुना १, २ आणि ३) चा अंतर्भाव असलेल्या मालमत्तेचे सर्व अविभाज्य भाग. २. माहीम डिव्हिजनच्या टीपीएस IV मधील प्लॉट नं. १०५४ ते १०५६, सामना प्रेसजवळ, न्यू प्रभादेवी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ येथील सुमेर ट्रिनिटी टॉवर, बिल्डिंग नं. १ मधील २२ व्या मजल्यावरील, २२०५ चौ. फूट चटई क्षेत्र असलेल्या सदनिका क्र. २२०२ (जुना ४, ५ व ६) चा अंतर्भाव असलेल्या मालमत्तेचे सर्व अविभाज्य भाग. (दोन्हीचे एकत्रितरीत्या ४१६० चौ. फूट चटई क्षेत्रफळ) | १९५५/- चौ. फूट २२०५ चौ. फूट एकूण क्षेत्रफळ ४१६० चौ. फूट | रु. २६,००,००,०००/- (रुपये सव्वीस कोटी फक्त) | रु.२,६०,००,०००/- (रुपये दोन कोटी साठ लाख फक्त) राखीव किमतीच्या १०% असलेली ही रक्कम रेखित दर्शनी धनाकर्ष स्वरूपात ‘दी रजिस्ट्रार सिटी सेशन्स कोर्ट, ग्रेटर मुंबई’ यांच्या नावे बोलीसोबत जोडावयाची आहे. |

श्री. पंकज अग्निहोत्री (मोबाइल नं. ८८७९८९०३६८) सहा. पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी (मोबाइल नं. ८६९११९७६७७७) यांच्यापैकी कोणालाही पूर्वसूचना दिल्यानंतर **१० ते १२ नोव्हेंबर २०२०** दरम्यान आणि **२३ ते २५ नोव्हेंबर २०२०** दरम्यान **सकाळी ११ वाजल्यापासून सायं. ६ वाजेपर्यंत** साइटवर प्रत्यक्ष पाहणीसाठी ही मालमत्ता उपलब्ध आहे.
सर्व प्रस्ताव केवळ बोली कागदपत्राद्वारेच द्यावेत जी कागदपत्रे रोख किंवा **“सीएफएमएआरसी ट्रस्ट-१ अपना बँक”** नावे काढलेल्या, “मुंबई” येथे देय असलेल्या दर्शनी धनाकर्ष स्वरूपात रु.१०००/- (ना-परतावायोग्य) प्रदान करून प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून खरेदी करता येतील. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया प्रतिभूत धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच **http://cfmarc.in/assets-for-sale.php** मध्ये दिलेली लिंक पाहा किंवा श्री. पंकज अग्निहोत्री (मोबाइल नं. ८८७९८९०३६८), सहा. पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी (मोबाइल नं. ८६९११९७६७७७) यांच्याशी संपर्क साधा.
प्राधिकृत अधिकारी
सीएफएम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(सीएफएमएआरसी ट्रस्ट-१ अपना बँकेचे विश्वस्त या नात्याने कार्यरत)
दिनांक: ०२.११.२०२०
स्थळ: मुंबई

**मनोरमा इंडस्ट्रीज लिमिटेड**
MANORAMA INDUSTRIES LIMITED
सीआयएन : एल१५१४२एमएच२००५पीएलसी२४३६८७
नोंदणीकृत कार्यालय : ऑफिस नं. ४०३, चौथा मजला, मिडास, सहार प्लाझा, अंधेरी-कुर्ला रोड, मुंबई-४०००५९, महाराष्ट्र. कॉर्पोरेट कार्यालय : एफ-६, अनुपमनगर, रायपूर-४९२००७.
टेलि : +९१ ७७१ २२८३०७१; फॅक्स : +९१ ७७१ ४०५६९५८
वेबसाइट : www.manoramagroup.co.in ई-मेल : cs@manoramagroup.co.in

**कंपनीच्या सदस्यांकरिता पोस्टल बॅलट नोटीस (रिमोट ई-व्होटिंगद्वारा)**

याद्वारा सूचना देण्यात येते की, निगम कामकाज मंत्रालय, भारत सरकार (**"एमसीए"**)यांच्याद्वारा निर्गमित केलेल्या दिनांकित ८ एप्रिल, २०२० साधारण परिपत्रक क्र. १४/२०२० व दिनांकित १३ एप्रिल, २०२० साधारण परिपत्रक क्र. १७/२०२० आणि दिनांकित २८ सप्टेंबर, २०२० साधारण परिपत्रक क्र. ३३/२०२० (**"साधारण परिपत्रके"**) या अनुसार आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वॉयरमेंट) रेग्युलेशन्स, २०१५ आणि अन्य सदर लागू कायदे व नियम, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार (**"नियम"**), कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २२ यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ (**"कायदा"**)च्या कलम १०८ व ११०च्या तरतुदी आणि अन्य लागू तरतुदींच्या अनुसार मनोरमा इंडस्ट्रीज लिमिटेड (**"कंपनी"**) दिनांकित २९ ऑक्टोबर, २०२० (**"पोस्टल बॅलट नोटीस"**) पोस्टल बॅलट नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार विशेष ठरावाद्वारा सदस्यांची मान्यता मिळवीत आहे. सदस्यांना कळविण्यात येते की, त्याकरिता स्पष्टीकरणात्मक विवरणासह नोटीस आणि रिमोट ई-व्होटिंगकरिता सूचना सर्व सदस्यांना, ज्यांचे ई-मेल पत्ते कट-ऑफ तारखेनुसार नोंदणीकृत आहेत, ई-मेलद्वारा पाठविण्यात आल्या आहेत. याद्वारा सर्व सदस्यांना कळविण्यात येते की :

१) पोस्टल बॅलट नोटीस पाठवणी पूर्ण होण्याची तारीख मंगळवार, ३ नोव्हेंबर, २०२० ही आहे.
२) पोस्टल बॅलट नोटीस सर्व सदस्यांना, ज्यांचे ई-मेल पत्ते **शुक्रवार, ३० ऑक्टोबर, २०२०** (**"कट-ऑफ तारीख"**) रोजीप्रमाणे कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/ रजिस्ट्रार व कंपनीचे शेअर ट्रान्सफर एजण्ट यांच्याकडे नोंदणीकृत आहेत, इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात आल्या आहेत. पोस्टल बॅलट नोटीस आणि सदस्यांच्या ई-मेल पत्त्यांच्या नोंदणीकरिता प्रक्रिया **www.manoramagroup.co.in** या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे, तसेच स्पष्टीकरणात्मक विवरणासह नोटीस बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहेत.
३) सदस्यांनी नोंद घ्यावी की, एमसीएद्वारा निर्गमित केलेल्या साधारण परिपत्रांच्या अनुसार कंपनीद्वारा प्रत्यक्ष बॅलट फॉर्म पाठविले जाणार नाहीत आणि सदस्य केवळ रिमोट ई-व्होटिंग सुविधेचा वापर करून त्यांचे मतदान करू शकतील.
४) साधारण परिपत्रकांच्या अनुसार, ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कट-ऑफ तारखेनुसार कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी **"Manorama - Postal Ballot- Registration of R-mail Id"** यावर रजिस्ट्रारकडे आणि **rnt.helpdesk@linkintime.co.in** यावर शेअर ट्रान्सफर एजण्ट म्हणजेच लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे आणि **cs@manoramagroup.co.in** या कंपनीच्या वेबसाइटवर नोंदणीकृत भागधारकाचे नाव, फोलिओ नंबर्स/ डीपी आयडी(ज)/ क्लाइंट आयडी(ज) आणि त्यांच्याकडे असलेल्या समन्याय भागांची संख्या यासह लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारा तरतूद केलेल्या रिमोट ई-व्होटिंग सुविधेद्वारा पोस्टल बॅलट नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार विशेष कामकाजावर त्यांचे मतदान करणे त्यांना सक्षम होण्याकरिता ते नोंदणी करू इच्छित असलेल्या ई-मेल पत्त्यावरून विषय नमूद करून ई-मेल पाठवून त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी करावी. प्रत्यक्ष स्वरूपात भाग असलेल्या सदस्यांद्वारा रिमोट ई-व्होटिंगद्वारा मतदान करण्याबाबत प्रक्रियेच्या तपशिलाकरिता किंवा ज्यांनी कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, अशा सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पोस्टल बॅलट नोटीसबाबत ई-व्होटिंग सूचना पाहाव्यात.
५) ज्या सदस्यांकडे कट-ऑफ तारखेनुसार समन्याय भाग आहेत तेच केवळ रिमोट ई-व्होटिंग सुविधेद्वारा त्यांचे मतदान करण्यास हक्कदार आहेत. कोणतीही व्यक्ती कट-ऑफ तारखेदिवशी कामकाज बंद होतेवेळी सदस्य नाही तिने ही सूचना केवळ माहितीप्रीत्यर्थ समजावी. कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधेची तरतूद करून देण्याकरिता लिंक इंडिया इन्टाइम प्रायव्हेट लिमिटेड (**"एलआयआयपीएल"**) यांची सेवा देऊ केली आहे.
६) ज्या सदस्याने रिमोट ई-व्होटिंगकरिता ई-व्होटिंग सूचना आणि संबंधित स्पष्टीकरणात्मक विवरणासह त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावर पोस्टल बॅलट नोटीस स्वीकारलेली नाही तर ते सदर नोटीस आमचे आरटीएम म्हणजेच रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजण्ट म्हणजेच लिंक इंडिया इन्टाइम प्रायव्हेट लिमिटेडच्या **rnt.helpdesk@linkintime.co.in** यावर आणि **cs@manoramagroup.co.in** या कंपनीच्या वेबसाइटवर ई-मेल पाठवून प्राप्त करू शकतील.
७) नियमांच्या नियम २२(५)च्या अनुसार आमच्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या २९ ऑक्टोबर, २०२० रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेत श्रीमती अश्विनी इनामदार यांची आणि त्यांच्या अनुपस्थितीत श्री. अतुल मेहता, मेहता अँड मेहताचे भागीदार, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज (फर्म रजिस्ट्रेशन नंबर पी१९९६एमएच००७५००) यांची स्वच्छ व पारदर्शक पद्धतीत पोस्ट बॅलटच्या आयोजनाकरिता ("केवळ रिमोट ई-व्होटिंगद्वारा") परीनिरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.
८) रिमोट ई-व्होटिंग गुरुवार, ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी स.०९.०० वा (भाप्रवे) सुरू होईल आणि शुक्रवार, ४ डिसेंबर, २०२० रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल. ई-व्होटिंग प्रणाली त्यानंतर निःसमर्थ करण्यात येईल आणि शुक्रवार, ४ डिसेंबर, २०२० रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) दरम्यान मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
९) पोस्टल बॅलटचा निकाल (रिमोट ई-व्होटिंगद्वारा) कंपनीच्या कॉर्पोरेट कार्यालयात रविवार, ६ डिसेंबर, २०२० रोजी किंवा तत्पूर्वी घोषित करण्यात येईल आणि बीएसई लिमिटेडकडे (**"बीएसई"**) पाठविण्यात येईल जेथे कंपनीचे समन्याय भाग सूचिबद्ध आहेत, तसेच **cs@manoramagroup.co.in** या कंपनीच्या वेबसाइटवर **https://instavote.linkintime.co.in** या एलआयआयपीएलच्या वेबसाइटवरसुद्धा प्रस्तुत करण्यात येईल.
१०) ई-व्होटिंगसंबंधित भागधारक/ सदस्यांना कोणतीही शंका असल्यास ते **फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स ("एफएक्यूज")** आणि हेल्प सेक्शनअंतर्गत **https://instavote.linkintime.co.in** यावर उपलब्ध असलेले **इन्स्टा व्होट ई-व्होटिंग मॅन्युअल** पाहावे किंवा **enotices@linkintime.co.in** यावर पाठवाव्यात किंवा संपर्क साधावा : टेलि : ०२२-४९१८ ६०००.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा
**मनोरमा इंडस्ट्रीज लिमिटेड**
स्वाक्षरी/-
विनिता सराफ,
अध्यक्ष व व्यवस्थापन संचालक
स्थळ : रायपूर
तारीख : ३ नोव्हेंबर, २०२०